**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २८ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **'प्रधानमंत्री जन धन योजने'ला आज ११ वर्षे पूर्ण.**
2. **कच्च्या कापसावरच्या आयातशुल्कातल्या सवलतीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ.**
3. **मराठा आणि ओबीसी दोन्ही समाजांच्या हिताचा विचार सरकार करेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मराठा आंदोलनासंदर्भात प्रतिपादन.**
4. **संत नगरी शेगाव मध्ये ऋषपंचमी निमित्त भक्तांची अलोट गर्दी.**
5. **विदर्भात अनेक जिल्ह्यात पावसाची हजेरी, संभाव्य पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर गडचिरोली जिल्हाधिकारींचे प्रशासनाला सतर्कतेचे निर्देश.**

---------------------------------

जनधन योजना

पंतप्रधान जन धन योजनेला आज ११ वर्षे पूर्ण झालीत. जगातल्या सर्वात मोठ्या आर्थिक समावेशक उपक्रमांपैकी एक अशा या योजनेची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०१४ या दिवशी केली होती. पंतप्रधान जन धन योजना ही व्यापक आर्थिक समावेशकतेसाठी एक राष्ट्रीय अभियान असून, देशातल्या सर्व कुटुंबांना बँकिंग सेवा प्रदान करण्यासाठी त्यात एकात्मिक दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण किंवा निमशहरी भागात ६७ टक्के खाती उघडण्यात आली असून, महिलांच्या मालकीची ५६ टक्के खाती आहेत. या योजनेनं दूरवरच्या भागात राहणाऱ्या वंचितांना औपचारिक वित्तीय क्षेत्रात आणलं आहे. ही योजना केवळ देशातच नव्हे तर संपूर्ण जगात सर्वात यशस्वी आर्थिक समावेशन उपक्रमांपैकी एक असल्याचं, अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी म्हटलं आहे. या योजनेच्या नागपुरातील लाभार्थ्यांचे मनोगत आपण ऐकुया ......

***(होल्ड बाईट - लाभार्थी)***

***जन-धन खाते उघडल्यामुळे मला युपीआय द्वारे ट्रान्झेक्शन करता येतो आणि एसबीआय एटीएम मधनं किंवा ग्राहक सेवा केंद्र मधनं मला पैसे जमा करता***

***येते आणि पैसे काढता पण येतातं आणि कुठल्याही योजनेद्वारे डीबीटीद्वारे माझ्या खात्यामध्ये पैसे जमा होतात आणि या योजनांचा मला खूप जास्त लाभ आहे आणि मी आभारी आहे.***

---------------------------------

कापूस सूट

भारतीय वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी कापसाची उपलब्धता वाढवण्यासाठी, केंद्र सरकारने १९ ऑगस्ट पासून ३० सप्टेंबर पर्यंत कापसावरील आयात शुल्क तात्पुरते सूट दिली होती. निर्यातदारांना अधिक पाठिंबा देण्यासाठी, केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्क सूट ३० सप्टेंबर पासून ३१ डिसेंबर पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

---------------------------------

बावनकुळे/सपकाळ/फडणवीस

राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या भूमिकेवर ठाम आहे, पण कोणत्याही समाजाचे आरक्षण कमी केले जाणार नाही. एका समाजातून आरक्षण काढून दुसऱ्याला देणे योग्य होणार नाही. मात्र याबाबत काँग्रेसने आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करावी असे मत व्यक्त करत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनावरून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. दरम्यान शासन मराठा आणि ओबीसी दोन्ही समाजांच्या हिताचा विचार करेल असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज माध्यमांशी बोलताना व्यक्त केलं ......

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस)***

***दोन्ही समाजाला माझी विनंती आहे कि शासन दोन्ही समाजाच्या हिताचा विचार करेल, कुठल्याही समाजाला दुसऱ्या समाजासमोर आणण्याचं शासनाचा हेतू नाही. त्यामुळे कोणावर अन्याय करून कोणाला देण्याचा प्रश्न नाही आहे. या दोघांचे प्रश्न आम्ही सोडवणार आहोत. त्यामुळे ओबीसी समाजानेही हे लक्षात ठेवावं की कुठेही त्यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही आणि मराठा समाजाने हे लक्षात घ्याव की आम्हीचं सोडवले आहेत सगळे प्रश्न, दुसऱ्या कोणी सोडवले आहे. आपल्याकडे कदाचित ती ईडब्ल्यूएसची मानसिकता तयार झाली नाही आणि त्याच्यामुळे काही प्रश्न कॉम्प्लिकेटेड आहेत. पण आता आपण तो प्रश्नही***

***सोडवलेला आहे आपण आरक्षण दिलेलचं आहे आणि ते कोर्टात अजूनही टिकलेला आहे.***

दरम्यान, भारतीय जनता पक्षाने मराठा समाजाला दिलेले आश्वासन पाळावे. केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार आहे. राज्यात प्रचंड मोठे बहुमत असून त्यांनी दिल्लीत जाऊन आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवावी. राजधर्माचे पालन करत तातडीने मराठा समाजाला आरक्षण देण्याची घोषणा करावी, असे आवाहन कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे. आज टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

---------------------------------

दीड दिवसांचा गणपती/ऋषि पंचमी

राज्यात उत्साहात सुरू झालेल्या गणेशोत्सवात आज दीड दिवसांच्या गणपतींना भक्तीभावाने निरोप दिला जात आहे. गणपती विसर्जनासाठी शहरात कृत्रिम विसर्जन तलावांची व्यवस्था करण्यात आली असून त्याचा लाभ नागरिक घेताना दिसत आसल्याचे आमच्या प्रतिनिधी ने कळवले. दरम्यान, विदर्भाची पंढरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या संतनगरी शेगाव येथे ऋषिपंचमीच्या संत गजानन महाराजांच्या संजीवन समाधी उत्सवाला 22 ऑगस्ट पासून प्रारंभ झाला आहे. संत श्री गजानन महाराजांच्या समाधीला 115 वा पुण्यतिथी सोहळा यंदा तंतोतंत त्या दिवशी आणि त्या तिथीला म्हणजेच ज्या दिवशी संत गजानन महाराज समाधीस्थ झाले तो दिवस म्हणजे 28 ऑगस्ट 1910 रोजी ऋषी पंचमी वार गुरुवार तिथी भाद्रपद शुद्ध पंचमी असा योग तब्बल 115 वर्षानंतर आल्याने या ऋषीपंचमी उत्सवाला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. ऋषिपंचमी निमित्त संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांकरिता संपूर्ण रात्रभर दर्शनासाठी समाधी स्थळ आणि सर्व मंदिर खुले राहणार आहे त्यामुळे संपूर्ण राज्यभरातून लाखोच्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत आहेत, ऐकुया नारायण पाटील या भक्ताचे मनोगत ----

***(होल्ड बाईट - नारायण पाटील)***

***मी विदर्भाची पंढरी असलेल्या शेगावमध्ये गेली 35 वर्षे ऋषीपंचमीचा उत्सवाला मी हाजरी लावत असतो. माझी ही गेली 35 वर्षापासूनची वारी आहे आणि जशी लोक पंढरपूरची वारी करतात तशी मी शेगावची वारी गेले 35 वर्षापासून करतो आणि इथे खूप आनंद मिळतो इतका आनंद मिळतो का तो गगनात सुद्धा मावत नाही आपल्या.***

----------------------------------

निर्माल्य रथांचे लोकार्पण

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांच्या हस्ते निर्माल्य रथांचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नागपूर महानगरपालिका द्वारे दरवर्षी शहरातील विविध गणेश मंडळांमध्ये जमा असलेले निर्माल्य विशेष निर्माल्य कलशामध्ये संकलित केले असे मनपा आयुक्त अभिजीत चौधरी यांनी सांगितले....

***(होल्ड बाइट - मनपा आयुक्त अभिजीत चौधरी)***

***निर्माल्य रथांचे सुविधा आम्ही दरवर्षी देत असतो यापूर्ण १०-११ दिवसांच्या कालावधीमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी निर्माल्य कलश काही ठिकाणी डोनेट करत असतो, तर काही ठिकाणी लोक स्वतः ठेवत असतात. त्यांच्याकडे जाऊन निर्माल्य प्रॉपरली कलेक्ट केलं जातं आणि त्याचा व्यवस्थित सायंटिफिक रित्या स्टोररिंग करत असतो. आमच्या नागपुर शहरामध्ये गेले काही वर्ष अतिशय स्थित्य स्वरूपामध्ये उपक्रम राबविला जातो म्हणजे आम्ही कोणत्याही नैर्सगिक हानी स्वरूपामध्ये गणपती विसर्जन करत नाही. त्यासाठी आपण विविध ज्या सुविधा आहेत त्या महानगरपालिकेमार्फत देत असतो साधारणतः संपूर्ण शहरात निर्मूल्य स्वरूपात, कृत्रिम टँक जी आहे प्रोवाइड करत असतो.***

----------------------------------

एक गाव, एक गणपती

बुद्धी आणि विद्येचे प्रतीक असलेल्या श्री गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना बुधवार, दि २७ ऑगस्ट रोजी भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशी करण्यात आली. अकोला जिल्हयातील तेल्हारा शहरात २५, तर ग्रामीण भागात ६५ ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या मंडपांमध्ये गणराया विराजमान झाले. एक गाव, एक गणपती या उपक्रमाला यंदाही ग्रामीण भागात चांगला प्रतिसाद मिळाला असून, २३ गावांमध्ये सामूहिक गणेशोत्सव साजरा केला जात आहे. शहर आणि गावांमध्ये वाजतगाजत श्रींची मूर्ती आणून सजवलेल्या मंडपात, तसेच घरांमध्ये विधीवत पूजन करून प्रतिष्ठापना करण्यात आली. तेल्हाऱ्यातील श्री शिवाजी, श्री तानाजी, श्री संभाजी, श्री लोकमान्य, श्री जय बजरंग, आणि श्री प्रताप गणेशोत्सव मंडळे ही जुनी आणि प्रतिष्ठित मंडळे मानली जातात. या मंडळांनी यंदाही सजावट, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले आहे.

----------------------------------

विदर्भ पाऊस/हवामान

विदर्भाच्या अनेक जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली आहे. नागपुरात सकाळ पासून कमी अधिक प्रमाणात पाऊस पडतो आहे. भंडारा जिल्ह्यात आठवडाभराच्या विश्रांती नंतर आज पावसाने जिल्हात सर्वदूर पर्यत दमदार हजेरी लावली तर धान उत्पादक शेतकऱ्यांना या पावसामुळे नवसंजीवनी मिळाली असून शेतकरी आनंदात आहेत. तेलंगणामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू असून, याचा परिणाम म्हणून गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा आणि भामरागड तालुक्यांमध्ये संभाव्य पूरपरिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी आज आढावा बैठक घेऊन महसूल, पोलीस आणि इतर संबंधित विभागांना तातडीने आवश्यक खबरदारी घेण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांचे स्थलांतर आणि आरोग्य सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करण्यावर त्यांनी भर दिला. दरम्यान, येत्या काही तासात विदर्भातील यवतमाळ आणि वाशीम इथं  काही ठिकाणी तर अमरावती, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये तुरळक  ठिकाणी मेघगर्जनेसह वादळ आणि हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. चंद्रपूर, गडचिरोली आणि अकोला या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे.

----------------------------------

मुदतवाढ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संलग्नित/संचालित महाविद्यालयाकरिता  विद्यापीठ आणि विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक स्वायत्ता प्राप्त विभागाकरिता शैक्षणिक वेळापत्रक निर्गमित केले होते. सदर वेळापत्रकात प्रथम वर्षात प्रवेशाची अंतिम तारीख २० ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढवून देण्यात आली होती. काही कारणास्तव ज्या विद्यार्थ्यांनी या तारखेपर्यंत प्रवेश घेऊ शकले नाहीत. असे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये म्हणून प्रथम सत्रात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता प्रवेशाच्या अंतीम तारखेत दिनांक ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत वाढ केलेली आहे.

----------------------------------